# प्रकरण पाचवे

## सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

**प्रकरण पाचवे**

# सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

५.१ प्रास्ताविक

५.२ संशोधनाचा सारांश

५.३ संशोधनाचे निष्कर्ष

५.४ निष्कर्षांची चर्चा

५.५ शिफारशी

५.६ पुढील संशोधनासाठी विषय

५.७ समारोप

## प्रकरण पाचवे

# सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

### ५.१ प्रास्ताविक

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधकाने केलेल्या संशोधनाचा सारांश, संशोधनाचे निष्कर्ष, निष्कर्षांची चर्चा, शिफारशी केल्या आहेत.

### ५.२ संशोधनाचा सारांश

आपल्या भारतीय घटनेने समानतेचे तत्व स्विकारले आहे. या तत्वाने देशाच्या प्रत्येक नागरिकाला समान अधिकार आहेत. अधिकार मिळालेला असला तरी समाजातील शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक दृष्ट्या न्यूनता असलेल्यांना आपली प्रगती करून घेण्यास संधीच मिळू शकली नाही. परिणामी हे सर्व घटक समानतेच्या तत्वाचा लाभ घेऊ शकले नाहीत. या घटकांना घटनेनुसार लाभ द्यावेत असा सकारात्मक विचारही सर्वार्थाने केला गेला नाही. त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या योजना त्यांच्यावर उपकार करीत आहोत अशा भूमिकेने राबविल्या जात असल्यामुळे केवळ आकडेवारी जमा करण्याच्या अट्टाहासामुळे या योजनांचा लाभ त्यांना मिळाला नाही. किती घटकांना प्रत्यक्षात लाभ मिळाला याचा आढावा घेतल्यास वस्तुस्थिती लक्षात येईल.

आपल्या देशात अंध, मूकबधिर, विकलांग, मतिमंद, मनोविकृत या विविध अपंग प्रकारांची कोट्यावधी माणसे मंदिर, चर्च, दर्गा व धार्मिक स्थळांसमोर भिक्षा मागताना दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर काळात या अपंगासाठी अनेकविध योजना आखण्यात आल्या. त्यावर कोट्यवधी रूपये खर्च करण्यात आले. पण या अपंगांना आम्ही उत्पादक घटक बनवू शकलो नाही. हा आत्मचिंतनाचा प्रश्न आहे. शासनाने अपंगांसाठी आखलेल्या योजनांवर केलेल्या खर्चापैकी किती खर्च प्रत्यक्ष अपंगाच्या शैक्षणिक व्यवसायिक, सामाजिक पुनर्वसनासाठी झाला याचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. उदाहरण द्यावयाचे म्हटले तर अपंगासाठी 'एकात्मिक शिक्षण योजना' गेल्या अनेक वर्षापासून राबविली जात आहे. या योजनेची माहिती समाज, शासन व प्रत्यक्ष शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या किती लोकांना आहे? हाही अभ्यासाचा विषय ठरावा.

**समस्या विधान**

"शिक्षक शिक्षण पदविका (डी.टी.एड.) अभ्यासक्रमातील अपंगांचे शिक्षण या घटकावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन - एक अभ्यास."

**पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या**

**I. शिक्षक शिक्षण पदविका**

**संकल्पनात्मक व्याख्या**

"प्राथमिक शिक्षक होण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक शिक्षण संशोधन परिषदेने जो व्दीवर्षी आराखडा तयार केला आहे. त्याला शिक्षक शिक्षण पदविका म्हणतात."

- **सोहनी श. कृ.**

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तूत संशोधनामध्ये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये असलेल्या डी.टी.एड. विद्यालयांचा समावेश केला गेला आहे.

**II. अभ्यासक्रम**

**संकल्पनात्मक व्याख्या**

"अभ्यासक्रम म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञान देणारे व रूढ पध्दतीने शिकविले जाणारे विषय नव्हेत तर शाळेत मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभवांचा त्यात अंतर्भाव केलेला असतो."

**मुदलियार आयोग**

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तूत संशोधनामध्ये डी.टी.एड. अभ्यासक्रमातील व्दितीय वर्षामध्ये असणाऱ्या पेपर क्रमांक एक प्राथमिक शिक्षण सद्यस्थिती, समस्या व उपाय यामधील अपंगांचे शिक्षण या घटकाचा समावेश केला गेला आहे.

**III. अपंगाचे शिक्षण**

**संकल्पनात्मक व्याख्या**

दृष्टीदोष, कर्णदोष, मतिमंद, अस्थिव्यंग व इतर अपंग व्यक्तींसाठी असलेले शिक्षण म्हणजे अपंगांचे शिक्षण होय.

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तूत संशोधनामध्ये दृष्टीदोष, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग अध्ययन अक्षम या घटकांचा अपंगांचे शिक्षण यामध्ये समावेश केला गेला आहे.

**IV. अनुदेशन संच**

**संकल्पनात्मक व्याख्या**

"All the components & a specific unit & programmed instruction, including books, text book suplimentary reading materials, learning aids."

- **Good C. V.**

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तूत संशोधनामध्ये दृष्टीदोष, मुकबधिर, कर्णबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग भावनिकदृष्ट्या असंतुलित या घटकांवर आधारित अनुदेशन संच पाठ्यांशानुसार विकसित करण्यात आला आहे.

**V. विकसन**

**संकल्पनात्मक व्याख्या**

"Developing is the act or process & developing unfolding a gradual growth or advancement through progressive changes."

**- NEW Websites dictionary**

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तूत संशोधनामध्ये अपंगांच्या शिक्षणावर आधारित विकसित केलेल्या अनुदेशन संचाचे परीक्षण यासाठी ही संज्ञा वापरली गेली आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. शिक्षक शिक्षण पदविका स्तरावरील अपंगांचे शिक्षण याविषयीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२. डी.टी.एड. छात्राध्यापकांचे अपंगांचे शिक्षण याबाबत असणाऱ्या मतांचा शोध घेणे.

३. डी.टी.एड. शिक्षक प्रशिक्षकांचे अपंगांचे शिक्षण याबाबत असणाऱ्या मतांचा शोध घेणे.

४. अपंगांचे शिक्षण या घटकावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन करणे.

५. अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासणे.

## संशोधनाची गृहितके

१. अध्यापक पदविका अभ्यासक्रमात अपंगांचे शिक्षण या घटकाचा समावेश आहे.

२. अपंगाचे शिक्षण याविषयी छात्राध्यापकांचे मत पूर्वग्रह दूषित आहे.

## संशोधनाची परिकल्पना

१. अनुदेशन संचाच्या सहाय्याने अध्ययन केल्याने छात्राध्यापकाचे अध्ययन परिणामकारक होते.

## शून्य परिकल्पना

१. नियंत्रित गटाच्या उत्तर चाचणीचे मध्यमान आणि प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणीचे मध्यमान यामध्ये लक्षणीय फरक दिसून येत नाही.

## संशोधनाची व्याप्ती

१. अध्यापक विद्यालयामधील छात्राध्यापकांना निष्कर्ष लागू होतात.

२. अपंगांचे शिक्षण या घटकांतर्गत दृष्टीदोष, श्रवणदोष, अस्थिव्यंग, मतिमंद आणि अध्ययन अक्षम यावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन करण्यात आले आहे.

## संशोधनाची परिमर्यादा

१. प्रस्तूत संशोधन हे २०१०-२०११ सालापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तूत संशोधनामध्ये अपंगांचे शिक्षण यातील दृष्टीदोष, श्रवणदोष, अस्थिव्यंग, मतिमंद आणि अध्ययन अक्षम या प्रकारांचा विचार केला आहे.

३. अनुदेशन संच मराठी भाषेमध्ये आहे.

## संशोधनाचे महत्त्व

### १. शिक्षक प्रशिक्षकांच्या दृष्टीने

i. समाजामध्ये असणाऱ्या अपंग व्यक्तींबाबत असणारा दृष्टीकोन सकारात्मक होईल.
ii. अपंग व्यक्ती, त्यांचे प्रकार याची माहिती होईल.
iii. अपंग व्यक्ती, त्यांच्या समस्या, त्याची कारणे इ. बाबींची माहिती होईल.

### २. छात्राध्यापकांच्या दृष्टीने

i. समाजामध्ये असणाऱ्या अपंग व्यक्तींबाबत असणारा दृष्टीकोन सकारात्मक होईल.
ii. अपंग व्यक्ती, त्यांचे प्रकार याची माहिती होईल.
iii. अपंग व्यक्ती, त्यांच्या समस्या, त्याची कारणे इ. बाबींची माहिती होईल.

### ३. पालकांच्या दृष्टीने

i. समाजामध्ये असणाऱ्या अपंग व्यक्तींबाबत असणारा दृष्टीकोन सकारात्मक होईल.
ii. अपंग व्यक्ती, त्यांचे प्रकार याची माहिती होईल.
iii. अपंग व्यक्ती, त्यांच्या समस्या, त्याची कारणे इ. बाबींची माहिती होईल.

### ४. समाजाच्या दृष्टीने

i. समाजामध्ये असणाऱ्या अपंग व्यक्तींबाबत असणारा दृष्टीकोन सकारात्मक होईल.
ii. अपंग व्यक्ती, त्यांचे प्रकार याची माहिती होईल.
iii. अपंग व्यक्ती, त्यांच्या समस्या, त्याची कारणे इ. बाबींची माहिती होईल.

BALASAHEB KHA... UNIVERSITY

**प्रस्तूत संशोधनाची कार्यपध्दती**

प्रस्तूत संशोधनामध्ये "शिक्षक शिक्षण पदविका (डी.टी.एड.) अभ्यासक्रमातील अपंगांचे शिक्षण या घटकावर अधारित अनुदेशन संचाचे विकसन - एक अभ्यास."

१. छात्राध्यापक व शिक्षक प्रशिक्षक यांच्या मतांचा अभ्यास करण्यासाठी शालेय सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. विकसित केलेल्या अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

२. प्रस्तूत संशोधनात संशोधकाने छात्राध्यापकांची नमुना निवड करताना सुगम यादृच्छिक पध्दतीने नमुना निवड केली आहे. शिक्षक प्रशिक्षकांची नमुना निवड करताना सहेतुक नमुना निवड केली आहे.

३. माहिती संकलनासाठी मतावली, पडताळा सूची व संपादन चाचणी या संशोधन साधनांचा वापर केला आहे.

४. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी, मध्यमान, प्रमाण विचलन व t परीक्षिका या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे.

५. केलेल्या अर्थनिर्वचनावरून निष्कर्ष काढले व आलेल्या निष्कर्षाच्या आधारे शिफारशी सुचविल्या आहेत.

## ५.३ संशोधनाचे निष्कर्ष

प्रस्तूत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

**उद्दिष्ट क्र. १ शिक्षक शिक्षण पदविका स्तरावरील अपंगांचे शिक्षण याविषयीच्या सद्यस्थितीचा अभ्यास**

**करणे.**

१. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये अपंगांचे शिक्षण या घटकाला विशेष महत्त्व दिले गेले नाही. पदविकेच्या द्वितीय वर्षातील पेपर क्रमांक १ प्राथमिक शिक्षण : सद्यस्थिती, समस्या व उपाय यामध्ये घटक क्रमांक ३ प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराची कारणे व समस्या या घटकामध्ये समावेश केला आहे. तसेच या घटकाच्या संदर्भात प्रात्यक्षिक कार्याचा समावेश केलेला नाही.

**उद्दिष्ट क्र. २ डी.टी.एड. छात्राध्यापकांचे अपंगांचे शिक्षण या घटकाच्या बाबत असणाऱ्या मतांचा शोध**

**घेणे.**

१. अपंग व्यक्तींना त्यांच्या गरजानुरूप, व्यावसायिक शिक्षण असावे. अपंगांच्या शिक्षणामध्ये त्यांच्या भविष्यकालीन स्थितीचा विचार करावा. पालक आपल्या अपंग बालकांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करतात. अपंगांच्या शिक्षणासाठी सामाजिक स्त्रोत, शैक्षणिक साधने यांचा वापर करावा. नवीन अध्यापन पध्दती, स्वयं अध्ययन संचाचा वापर करावा. नेहमीपेक्षा वेगळे मूल्यमापन तंत्र असावे असे बहुतांशी छात्राध्यापकांचे मत आहे.

२. अपंग व्यक्तींना शिक्षण मिळावे म्हणून वेगळे कायदे असावेत तसेच अपंगांच्या शिक्षणामुळे त्यांना शिक्षणाचा हक्क मिळाला आहे. लोकशाहीचे बळकटीकरण होवून त्यांचे सामाजिकीकरण होणार आहे. तसेच विविध मानवी, लोकशाही मूल्ये विकसित होणार आहेत असे बहुतांशी छात्राध्यापकांचे मत आहे.

३. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये अपंगांचे शिक्षण या घटकामध्ये आणखीन आशयाचा समावेश करावा. यामध्ये अपंगांचे प्रकार, त्यांची वैशिष्ट्ये, पूनर्वसन कार्यक्रम यांचा समावेश करावा. सध्याच्या अभ्यासक्रमातून पुरेसे प्रशिक्षण मिळत नाही असे बहुतांशी छात्राध्यापकांचे मत आहे.

**उद्दिष्ट क्र. ३ डी.टी.एड. शिक्षक प्रशिक्षकांच्या अपंगांचे शिक्षण याबाबत असणाऱ्या मतांचा शोध घेणे.**

१. अपंग व्यक्तींना त्यांच्या गरजानुरूप व्यावसायिक शिक्षण असावे. अपंगांच्या शिक्षणामध्ये त्यांच्या भविष्यकालीन स्थितीचा विचार करावा. पालक आपल्या अपंग बालकांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करतात असे बहुतांशी शिक्षक प्रशिक्षकांचे मत आहे.

२. अपंगांच्या शिक्षणासाठी विविध सामाजिक स्त्रोतांचा शैक्षणिक साधनांचा वापर करावा. नवीन अध्यापन पध्दती, कार्यनिती, स्वयंअध्ययन संचाचा वापर करावा तसेच मूल्यमापन तंत्रामध्ये बदल करावा असे बहुतांशी शिक्षक प्रशिक्षकांचे मत आहे.

३. अपंगांच्या सामाजिकीकरणासाठी स्नेहसंमेलन, सर्व समावेशक शिक्षण उपयुक्त आहे. अपंगांच्या शिक्षणातून लोकशाहीतून बळकटीकरण होऊन मानवी, सामाजिक व लोकशाही मूल्ये विकसित होणार आहे असे बहुतांशी शिक्षक प्रशिक्षकांचे मत आहे.

४. अपंग व्यक्तींना शिकविण्यासाठी प्रशिक्षणामध्ये बदल होणे गरजेचे आहे. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये अपंगांचे शिक्षण या घटकामध्ये आणखीन आशय असावा. त्यामध्ये अपंगांचे प्रकार, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांचे मानसशास्त्र इत्यादींचा समावेश असावा.

**उद्दिष्ट क्र. ४ अपंगांचे शिक्षण या घटकावर आधारित अनुदेशन संचाचे विकसन करणे.**

१. प्रस्तूत संशोधनामध्ये ADDIE Model चा वापर केला आहे. ADDIE Model हे अनुदेशन साहित्य निर्मितीसाठी सर्वात जास्त प्रमाणात वापरले जाते. या प्रतिमानामध्ये अनुदेशन साहित्य विकसनासाठी लवचिकता असून वेळ, पैसा यामध्ये बचत होते. परिणामकारक प्रशिक्षण आणि कार्यमान यासाठी उपयुक्त आहे. या प्रतिमानामध्ये एकूण पाच पायऱ्या आहेत. विश्लेषण (Analysis), रचना (Design), विकसन (Development), अंमलबजावणी (Implementation) आणि मूल्यमापन (Evaluation).

**उद्दिष्ट क्र. ५ अनुदेशन संचाची परिणामकारकता तपासणे.**

१. विकसित केलेल्या अनुदेशन संचामध्ये घटकांच्या उद्दिष्टांची मांडणी योग्य असून, माहिती घटकानुरूप आहे. आशय क्रमबध्द व अचूक आहे. आशयानुसार स्पष्टीकरण दिले आहे. छात्राध्यापकांना स्वयं अध्ययनासाठी उपयुक्त आहे असे बहुतांशी शिक्षक प्रशिक्षकांचे मत आहे.

२. विकसित केलेल्या अनुदेशन संचाची उपचार मात्रा दिल्यानंतर समतुल्य गटामध्ये नियंत्रित गट व प्रायोगिक गट यांच्या मध्यमानामध्ये लक्षणीय फरक आढळून आला.

## ५.४ निष्कर्षांची चर्चा

प्रस्तूत संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांची चर्चा पुढीलप्रमाणे

भावे, बी. एस. यांनी संशोधनामध्ये गणित परिणामकारक अध्यापनासाठी पारंपारिक पध्दती व संगणक सहाय्यित अनुदेशन पध्दती यांचा तुलनात्मक अभ्यास केला त्यावरून असे दिसले की, संगणक सहाय्यित अनुदेशन ही पारंपारिक पध्दतीपेक्षा जास्त परिणामकारक आहे. तसेच ही पध्दती विद्यार्थी व शिक्षक या दोहोंनाही उपयुक्त आहे. सरवणकर, सुविद्या यांनी गणित विषयासाठी संगणक आधारित स्व अनुदेशन साहित्याचे विकसन केले आहे. यावरून असे दिसून आले की, विकसित केलेले संगणक आधारित स्व अनुदेशन परिणामकारक आहे. विद्यार्थी व शिक्षक विकसित केलेल्या अनुदेशन साहित्याबाबत समाधानी दिसून आले. वाघ, एस. के. यांच्या संशोधनामध्ये दशांश अपूर्णांकासाठी बहूमाध्यम अनुदेशन प्रणाली विकसित केली आहे. त्यावरून असे दिसून येते की, विकसित केलेली अनुदेशन प्रणाली विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीवर सकारात्मक प्रभाव टाकते. Dick & Carry यांनी त्यांच्या लेखामध्ये अनुदेशनासाठी उपयुक्त असे प्रतिमान दिलेले आहे. या प्रतिमानाचा वापर करून परिणामकारक अनुदेशन संच विकसित करता येतो. Marget, B. यांच्या लेखामधून त्यांनी अनुदेशन साहित्याचा प्रभाव स्पष्ट केला आहे. तसेच अनुदेशन साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या संपादनात वाढ होवून ते प्रभुत्व पातळीकडे जातात. शिक्षकांनी अध्ययन अध्यापनात अनुदेशन संचाचा वापर मोठ्या प्रमाणात करणे गरजेचे आहे.

Mohite, Prerana यांनी वर्ग अनुदेशन कार्यक्रमाचे विकसन व अंमलबजावणी केली आहे. यावरून असे दिसून आले की, प्रायोगिक गटातील बालकांच्या मुक वाचनामध्ये प्रगती दिसून आली. Pawar, S. R. यांनी त्यांच्या संशोधनात सुक्ष्म अध्यापनातील प्रस्तावना या कौशल्यासाठी अनुदेशन साहित्याचे विकसन केलेले आहे. त्या संशोधनातून असे दिसून आले की, तात्विक भागावर प्रभुत्व मिळविण्यासाठी अनुदेशन साहित्य उपयुक्त आहे. तसेच अध्ययन अध्यापन कृतीच्या संदर्भात अनुदेशन साहित्य परिणामकारक आहे. Pawar, V. S. यांनी त्यांच्या संशोधनामध्ये दूरस्थ बी. एड. अभ्यासक्रमासाठी स्व अनुदेशन साहित्याचे विकसन केलेले आहे. त्यावरून असे दिसून येते की, स्व अनुदेशन संचामध्ये परिचित उदाहरणे, अध्ययन अनुभव यांचा वापर योग्य प्रकारे दिसून आला. विद्यार्थ्यांची स्वयं प्रक्रिया आणि व्यक्तीमत्व विकास यांचे मूल्यमापन क्षमता सरासरी एवढी आढळून आली. Sharma, Premlata & Pandey, Savita यांनी कर्णबधिरांसाठी अनुदेशन

साहित्य विकसित केले. यावरून असे दिसून आले की, कर्णबधिर बालकांच्या विज्ञान संपादणामध्ये वाढ दिसून आली. अनुदेशन माध्यमाचा, भाषेचा विज्ञान संपादनावर परिणाम होत नाही. या सर्वांच्या निष्कर्षांसोबत संशोधकाचा निष्कर्ष क्रमांक ५ मिळता जुळता आहे.

## ५.५ शिफारशी

### १. महाराष्ट्र शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद

i. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये अपंगांचे शिक्षण यासाठी बदल करावा.

ii. अपंगांच्या शिक्षणासाठी शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रात्यक्षिक व विविध उपक्रमांचा,

प्रत्यक्ष भेटींचा समावेश करावा.

iii. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमामध्ये विविध अध्यापन पध्दती, कार्यनिती, तंत्रे वापरण्यासाठीचे

प्रशिक्षण असावे.

iv. अपंगांसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती अभ्यासक्रमामध्ये द्यावी.

### २. अध्यापक विद्यालय

i. अपंगांच्या शिक्षणाविषयी छात्राध्यापकांना सर्वंकष माहिती द्यावी.

ii. सैधांतिक भागापेक्षा प्रात्यक्षिक भागाला जास्त महत्त्व द्यावे.

iii. छात्राध्यापकांना प्रशिक्षण देताना अपंगांच्या प्रकारानुसार असलेल्या विशेष शाळांच्या भेटींचे आयोजन करावे.

iv. अपंगांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अपंग व्यक्ती, त्यांचे पालक, शिक्षक इ. साठी कृतिसत्र, कार्यशाळा, शिबिरे आयोजित करावीत.

### ३. शिक्षक प्रशिक्षक

i. अपंगांच्या शिक्षणाविषयी छात्राध्यापकांना सर्वंकष माहिती द्यावी.

ii. प्रात्यक्षिकांची कार्यवाही करत असताना छात्राध्यापकांना प्रत्यक्ष भेट देवून माहिती मिळविण्यासाठी प्रयत्त करावेत.

iii. छात्राध्यापकांना प्रशिक्षण देताना अपंगांच्या प्रकारानुसार असलेल्या विशेष शाळांच्या भेटींचे आयोजन करावे.

## ५.६ पुढील संशोधनासाठीचे विषय

१. अशाप्रकारचे संशोधन शिक्षक शिक्षणातील इतर स्तरांकरितासुध्दा करता येईल.

२. शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रमातील इतर घटकांच्या बाबतीतसुध्दा असेच संशोधन करता येईल.

## ५.७ समारोप

प्रस्तूत प्रकरणामध्ये संशोधनाचा सारांश, संशोधनाचे निष्कर्ष, निष्कर्षांची चर्चा, शिफारशी व पुढील संशोधनासाठीचे विषय याचा उल्लेख केलेला आहे.

**संदर्भ सूची**

अडमुठे रूपाली (जून २००३) बी.एड. अभ्यासक्रमातील शैक्षणिक मानसशास्त्र या विषयातील एका घटकावर आधारित संगणक सॉफ्टवेअरचे विकसन. अप्रकाशित एम.फिल. शोधनिबध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

इनामदार, इरफान (२००६)विद्यार्थी शिक्षकासाठी भूगोलाच्या आशय समृध्दी संचाचे विकसन-एक अभ्यास.अप्रकाशित पी.एच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

करंदीकर, सुरेश (२००८), शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

जगताप, ह.ना. (१९९५) (संपा), शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे : अनमोल प्रकाशन.

जगताप, ह.ना. (१९९९), शैक्षणिक तंत्रविज्ञान, पुणे : नुतन प्रकाशन.

दांडेकर, वा.ना. (१९७०), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, कोल्हापूर : मोघे प्रकाशन.

पंडित, बन्सी (२००८), शिक्षणातील संशोधन, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.

पाटील, वा. भा. (२००६), संशोधन पध्दती, पुणे : प्रशांत पब्लिकेशन.

पांडव, प्रमोद (एप्रिल २००८) अंशतः अंधांसाठी गुणवत्ता शिक्षण. शिक्षण संक्रमण पृष्ठ क्र. २५- ३०

भावे बी. एस. (२००२) गणित परिणामकारक अध्यापनासाठी पारंपारिक पध्दती व संगणक सहाय्यित अनुदेशन पध्दती यांचा तुलनात्मक अभ्यास. अप्रकाशित पी.एच. डी, प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

भिंताडे, वि. रा. (२००८), शैक्षणिक संशोधन पुणे : नुतन प्रकाशन.

भोसले आणि इतर (२००७), शिक्षण क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांची तयारी, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

भोसले ,स्वामी (ऑगस्ट २०१०) आशय समृध्दीसाठी स्व अध्ययन संच. भारतीय शिक्षण पृष्ठ क्र. २०-२८

मुळे, रा. श. आणि उमाठे, वि. तु. (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

सरवणकर, सुविद्या (डिसेंबर २००७) इयत्ता आठवीमधील गणित विषयासाठी संगणक आधारित स्व अनुदेशन साहित्याचे विकसन एक अभ्यास. अप्रकाशित पी.एच. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

शिक्षक शिक्षण पदविका अभ्यासक्रम (२००५), पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.